## : रे.मु.नं.२७७/२०१३ मधील अर्ज नि.७ आणि ७४ वरील आदेश :

१. दोन्ही अर्ज वाचले. अर्जावर उभयपक्षाने दिलेले उत्तर वाचले. वादींतर्फे मा.वकिल श्री.एस्.एच्.निमसे आणि प्रतिवादींतर्फे मा. वकिल श्री.ए.एम्.संकलेचा यांचा युक्तीवाद ऐकला. वादीं व प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ३९ नियम १ नुसार तुर्तातुर्त मनाई ताकीदीचे अर्ज दिले आहेत.

२. वादींचे कथन असे की, दावा मिळकत वादी व प्रतिवादीची वडिलोपार्जीत एकत्र हिंदु कुटुंबाची मिळकत आहे. दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. वादीने प्रतिवादींना दावा मिळकतीमध्ये असणारा अविभक्त हिस्सा मागितला असता प्रतिवादींनी दिला नाही. वादीचा हिस्सा बुडविण्याच्या उद्देशाने प्रतिवादी दावा मिळकत हस्तांतरणाच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादींनी जर दावा मिळकत हस्तांतरीत केली तर वादींचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होईल. दाव्याचा गुणदोषांवर निकाल लागण्यास बराच अवधी लागणार आहे. सबब दाव्याचा निकाल होईपावेतो प्रतिवादीं १ ते ७ यांनी दावा मिळकत कोणत्याहीप्रकारे हस्तांतरीत करु नये असा त्यांच्याविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्याकरीता वादींने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींनी नि.३८ ला अर्जास म्हणणे देवून विरोध दर्शविला आणि अर्जातील कथने नाकारली. त्यांचे कथन असे की, दावा मिळकतीपैकी गट नं.१६० मधील निम्मे क्षेत्र प्रतिवादी १ ने त्याच्या स्वकष्टाच्या मिळकतीतुन खरेदी केलेले आहे. त्याच वादीचा काहीही हिस्सा नाही. वडिलोपार्जीत मिळकतीचे वादी व प्रतिवादींमध्ये तोंडी वाटप झालेले आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी १ व २ यांच्या नावाच्या नोंदी झालेल्या आहेत. सन १९९९-२००० पासून वादी व प्रतिवादी १ व २ वेगवेगळे राहत आहेत. वादीने दाव्यात सर्व आवश्यक पक्षकार सामील केलेले नाहीत. विकल्पेकरुन जर दावा मिळकती वडिलोपार्जीत मिळकती आहेत व त्यांचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही असे न्यायालयाचे मत झाल्यास

कब्जेवहीवाटीत असलेला हिस्सा ज्याच्या त्याच्या वाट्यात देण्यात यावा. सदरचा दावा व अर्ज प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आलेला आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादींच्या कथनानुसार खालील मुद्दे उपस्थित होतात व माझे या मुद्दयांवर पुढीलप्रमाणे उत्तरे आहेत.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी अर्ज सकृतदर्शनी शाबीत करतो काय ? | ... | नकारार्थी |
| २. | न्यायाचा तराजू वादींच्या बाजूने आहे असे वादी शाबीत करतो काय ? | ... | नकारार्थी |
| ३. | अर्ज फेटाळल्यास वादींचे न भरुन येणारे नुकसान होईल असे वादी शाबीत करतो काय ? | ... | नकारार्थी |
| ४. | कोणता आदेश ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

५. प्रतिवादीं नं.१ ते ४ यांनी नि.७४ ला वादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेकरीता अर्ज दाखल केला. त्याचे कथन असे की, दावा मिळकती त्यांच्या कब्जात आहेत. त्यापैकी काही मिळकती वडिलार्जीत असून काही मिळकती स्वतंत्र खरेदी मालकीच्या आहेत. दावा मिळकतीमधील काही क्षेत्रात प्रतिवादींनी पिके घेतलेली आहेत. दाव्याचा निकाल होणेस अवधी लागणार आहे. वादीने पिक काढून नेल्यास प्रतिवादींचे न भरुन येणारे नुकसान होईल. तरी वादीने प्रतिवादीचे दावा मिळकतीचे प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अथवा पिकांचे नुकसान करु नये असा त्याजविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकुम मिळणेकरीता प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

६. वादीने नि.७६ ला सदर अर्जास म्हणणे देवून विरोध दर्शविला. वादीचे म्हणणे असे की, दावा मिळकती वादी व प्रतिवादी १ ते ५ यांच्या वडिलार्जीत मिळकती आहेत. दावा मिळकती प्रतिवादी १ ते ४

यांच्या कब्जात आहेत. त्यापैकी काही मिळकती वडिलार्जीत तर काही मिळकती स्वतंत्र खरेदी मालकीच्या आहेत. दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा.

७. प्रतिवादीं आणि वादीच्या कथनानुसार खालील मुद्दे उपस्थित होतात व माझे या मुद्दयांवर पुढीलप्रमाणे उत्तरे आहेत.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रतिवादी अर्ज सकृतदर्शनी शाबीत करतात काय ? | ... | नकारार्थी |
| २. | न्यायाचा तराजू प्रतिवादींच्या बाजूने आहे असे प्रतिवादी शाबीत करतात काय ? | ... | नकारार्थी |
| ३. | अर्ज फेटाळल्यास प्रतिवादींचे न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रतिवादी शाबीत करतात काय ? | ... | नकारार्थी |
| ४. | कोणता आदेश ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

**: कारणमिमांसा :**

८. **<u>दोन्ही अर्जातील मुद्दा क.१ ते ४ बाबत :-</u>** वादीतर्फे मा.वकिल श्री.निमसे यांनी युक्तीवाद केला की मुळातच दावा मिळकती या वडिलोपार्जीत मिळकती आहेत. १९८३ साली प्रतिवादी ४ च्या नावे एक बोगस खरेदीखत करुन देण्यात आले. याचे कारण सिलिंगपेक्षा जास्त जमीन नावावर येत होत्या व त्याचा अडसर होवू नये म्हणून ते करण्यात आले. परंतु वादी प्रतिवादी १ व २ यांची दावा मिळकतीवर कब्जेवहिवाट आहे. तसेच वादी प्रतिवादींचे वडिल रावसाहेब हयात असतांना दावा मिळकतीपैकी गट नं.४७१ व १६० या मिळकती वडिलोपार्जीत उत्पन्नातुन पाराजीच्या नावे खरेदी केलेल्या आहेत. मात्र पुढे पाराजीने प्रतिवादी २ च्या नावे त्या मिळकती करु दिल्या. गट नं. १३४ ही सुध्दा वडिलोपार्जीत उत्पन्नातुन प्रतिवादी ३ च्या नावे खरेदी केलेल्या आहेत. वादी प्रतिवादी १ व २ यास प्रतिवादी ६ भाउ होता परंतु

तो चुलत्यांना दत्तक गेला. अशाप्रकारे बोगस खरेदीखते दाखवून व तलाठ्याकडे अर्ज देवून नावे लावून घेण्याचा प्रकार वादीच्या लक्षात आल्यानंतर वादीने हिस्सा मागितला असता त्यास नकार दिला गेला. म्हणून वादीने हा दावा दाखल केला. प्रतिवादी दावा मिळकतीची विक्री करण्याच्या विचारात आहेत. याउलट वादींचा काही ताबाच नाही असे म्हणून वादींविरुध्द मनाई ताकीदीचा अर्ज दिलेला आहे. मुळातच प्रतिवादी हा अर्ज देवू शकत नाही कारण तो कायद्याने चालु शकत नाही. एकत्रीत मिळकत असल्याने वादींकडून प्रतिवादीच्या ताबेवहिवाटीला हरकत अडथळा होण्याचा प्रश्नच नाही. सबब वादीचा अर्ज मंजुर होवून प्रतिवादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

९. वादीतर्फे मा.वकिल श्री.निमसे यांनी आपल्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील निकाल दाखले सादर केले.

(i) **Ganesh D. Daivajna Vs. Prakash S. Salkar, 2003(3) Mh.L.J. 347** wherein it is held that “Possession ought to be lawful to enable party to seek protection from Court by way of equitable relief.”

(ii) **Prakash S. Akotkar Vs. Mansoorkha Gulabkha AIR 1996 Bombay 36** wherein it is held that “Co-owner in possession of property for and on behalf of other co-owners – Cannot claim injunction against other Co-owners restraining them from interfering with his possession and enjoyment of suit property so as to exclude them from exercising their right as co-owners.

(iii) **Nanasaheb Vs. Dattu, 1991 Mh.L.J. 685** wherein it is held that “Defendant not entitled to injunction against plaintiff in case covered by Order 39, Rule 1(b) and (c) – Where case is covered by Order 39, Rule 1(a) Court has jurisdiction to grant injunction in favour of defendant.”

१०. प्रतिवादीतर्फे मा.वकिल श्री.संकलेचा यांनी युक्तीवाद केला की मुळातच वादीतर्फे खोटा अर्ज केलेला आहे. गट नं.४७२ पैकी अर्ध्या हिश्श्याची जमीन प्रतिवादी ४ ला १९८३ ला चार हजार रुपये घेवून वादी प्रतिवादीचे मुळ पुरुष रावसाहेब यांनी विकलेली आहे. तर गट नं.६४७/१ ६४७/२ आणि ६४७/३ यासुध्दा रावसाहेब यांनी प्रतिवादी ४ ला विक्री

केलेल्या आहेत. या मिळकतीवर तिचे नाव आहे. वादी व त्याच्या वडिलांमध्ये पूर्वी झालेल्या दोन दाव्यांमध्ये या खरेदीखताची पूर्ण माहीती वादीला होता. त्यामुळे खोटी व बिनभरण्याचे आहेत हे वादीचे कथन खोटे आहे. ४७१ पैकी 2/3 हिश्श्याची मिळकत प्रतिवादी १ ने स्वतः विकत घेतलेली आहे. उरलेला 1/3 हिस्सा पुन्हा प्रतिवादी १ ने खरेदी केलेला असून त्यानुसार प्रतिवादी १ ची त्या मिळकतीमध्ये नोंद आहे. सन ९९-२००० मध्ये तोंडी वाटप झाले होते. त्यानुसार नोंदी झालेल्या आहेत. ही बाब वादीला स्पष्ट माहीती आहे. तसेच वादीने सर्व आवश्यक पक्षकारांना सामील केलेले नाही. असे असतांना प्रतिवादीची कब्जेवहिवाट असलेल्या जमीनीमध्ये प्रतिवादीने घेतलेल्या पिकांना स्वतः काढून नेण्याची भाशा वादी करीत आहे. त्यामुळे वादीचा अर्ज खोटा असून तो फेटाळण्यात यावा व प्रतिवादीने घेतलेली पिके प्रतिवादींना मिळावी म्हणून प्रतिवादीच्या कब्जेवहिवाटीला हरकत अडथळा करु नये अशी वादीला मनाई ताकीद देण्यात यावी.

११. १९८३ साली प्रतिवादी ४ च्या नावावर दावा मिळकतीपैकी काही मिळकतीचे खरेदीखत झाली व त्याची नोंद फेरफार नं.४१० व ४११ ने झाली. ही खरेदीखते बोगस, बेकायदेशीर व सिलिंग ॲक्टचा त्रास होवू नये म्हणून करण्यात आली अथवा नाही ही बाब पुराव्याअंती स्पष्ट होईल परंतु एक स्पष्ट होते की दावा मिळकतीतील काही मिळकती वडिलोपार्जीत मिळकती आहेत तर काही मिळकती या नंतर खरेदी करण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये गट नं.४७१ व १६० या मिळकती आहेत. दुसरे असे की, ही खरेदी वडिलोपार्जीत उत्पन्नातुन झाली अथवा स्वकष्टाच्या उत्पन्नातुन झाली प्रतिवादी १ च्या नावाने हे पुराव्यातअंती ठरेल. परंतु १९८३ सालामध्ये झालेल्या खरेदीखताची माहीती वादीला आता झाली हे स्विकारण्यासारखे नाही. दुसरे असे की फेरफार नं.१४०९ तहसिलदार यांच्याकडे झालेल्या वाटपानुसार फक्त गट नं.१६० मध्ये नोंद आहे. बाकीची का झाली नाही याबाबत काहीही कागदपत्र न्यायालयासमोर आले नाही. १९८३ ची खरेदीखते रावसाहेबने केली होती. तर रावसाहेब व त्याच्यानंतर वादी प्रतिवादी यांना शेतीशिवाय इतर

कोणतेही उत्पन्न नव्हते याबाबत काहीही पुरावा नाही. त्यामुळे उत्पन्नाचे साधन वडिलोपार्जीत मिळकती याच आहेत. अशापरिस्थितीत काही मिळकती वडिलोपार्जीत असल्याचे मान्य केले आहे. हे पाहता मिळकतीची खरेदी वडिलोपार्जीत उत्पन्नातुन झाली असेच म्हणावे लागेल. वडिलोपार्जीत मिळकती असतील तर कुटुंबातील सर्व सदस्यांचा ताबा असतो. एका व्यक्तीचा ताबा आहे असे म्हणता येणार नाही. कुटुंबातील एखादी व्यक्ती बाहेरगावी राहत असेल तरीसुध्दा तिचा ताबा नाही असे म्हणाता येत नाही. अशापरिस्थितीत एकत्र कुटुंबाचा ताबा आहे असेच म्हणावे लागेल. वाटप झाल्याचा जो फेरफार सादर करण्यात आला त्यामध्ये गट नं.१६० सोडून बाकीच्या मिळकती नमुद नाहीत. प्रतिवादी म्हणतात तोंडी वाटप झाले. परंतु तसा कोणताही सकृतदर्शनी पुरावा नाही. जो काही पुरावा हजर केला तो शंकास्पद आहे. फेरफारामध्ये सर्व मिळकती का नाही याचे स्पष्टीकरण नाही.

१२. वादी म्हणतात की प्रतिवादी दावा मिळकत विक्री करतील किंवा हस्तांतरीत करतील. परंतु तशी शक्यता आहे हे दाखविण्यासाठी काहीही सकृतदर्शनी पुरावा नाही. वादीच्या या म्हणण्याला पुष्ठी देण्याकरीता इतर कोणत्याही साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र नाही. दावा मिळकतीचे वाटप मागितलेले आहे. प्रतिवादी हे दावेकामी हजर झालेले आहेत आणि प्रतिवादी यांना दाव्याची पूर्ण माहीती आहे अशापरिस्थितीत मिळकत हस्तांतर कायदा कलम ५२ नुसार विकत घेणारा दाव्याच्या निकालाला अधिन राहुनच विकत घेईल असे तत्व आहे. त्यामुळे कोणाचेही नुकसान होणार नाही. एकत्र कुटुंबातील सदस्य हा त्याचा अविभक्त हिस्सा विकू शकतो. त्याला कोणीही अडवू शकत नाही. दुसरे असे की सर्वांचा एकत्रीत ताबा असल्यामुळे एक सदस्य दुस-या सदस्याच्याविरुध्द हरकत अडथळा ताबेवहिवाटीला केला जातो म्हणून मनाई ताकीद मागु शकत नाही. मिळकतीची विक्री होते असा पुरावा नसल्यामुळे वादी प्रतिवादीला हरकत अडथळा करीत आहेत हेसुध्दा स्विकारता येणार नाही कारण प्रतिवादीनेसुध्दा नुसता अर्ज दिला तर त्या अर्जाला पुष्ठी देण्याकरीता इतर कोणताही पुरावा दिलेला नाही. प्रतिवादीने

स्वतः वेगळी पिके घेतली व प्रतिवादीचा वेगळा ताबा आहे असा पुरावाच नाही. सबब वादी व प्रतिवादी हे आपले अर्ज सकृतदर्शनी शाबीत करु शकले नाही. त्यामुळे माझे मुद्दा क्र.१ दोघांचेही अर्जावर नकारार्थी उत्तर आहे.

१३. मी माझे याआधीच मुद्दा क्र.१ वर नकारार्थी उत्तर दिलेले आहे. मिळकत विक्री होत आहे असे सकृतदर्शनी शाबीत झालेले नाही. एकत्र कुटुंबातील सदस्य त्याचा अविभक्त हिस्सा विकू शकतो व दुसरे असे की, एखाद्या सदस्याविरुध्द किंवा तो सदस्य ताबेवहिवाटीला हरकत अडथळा करु नये म्हणून एकत्र कुटुंबाच्या मिळकतीबाबत मनाई ताकीद मागू शकतो. त्यामुळे वादी अथवा प्रतिवादींना खूप त्रास होईल असा पुरावा नाही. प्रतिवादीने एकट्याने पिके घेतली असाही पुरावा नाही. अशापरिस्थितीत न्यायाचा तराजू वादी व प्रतिवादी यांच्या बाजुने आहे हे त्यांनी केलेल्या कथनानुसार शाबीत होत नाही. अर्ज फेटाळल्यास दोघ ांनाही न भरुन होणारे नुकसान होईल हे शाबीत होत नाही. सबब दोन्ही अर्जावरील मुद्दा क्र.२ व ३ वर माझे नकारार्थी उत्तर असून दोन्ही अर्जावरील मुद्दा क्र.४ च्या उत्तराकरीता खालील आदेश पारीत केलेला आहे.

**: आ दे श :**

(१) अर्ज नि.७ आणि ७४ फेटाळण्यात येत आहेत.

(२) अर्जांचा खर्च दाव्याच्या खर्चामध्ये सामाविष्ट राहील.

(र.श्री.जांबोटकर)

दिनांक :- १७/१२/२०१४. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

पारनेर